

# मराठी (प्रथम भाषा) लेख- ३

**आसावरी सुर्वे, शाळा :** विद्या मंदिर, दहिसर

विद्यार्थी मित्रांनो

तुमच्या कष्टपर्वाला सुरुवात झालेली आहे. तुमच्या डोळ्यातील कुतूहल मला दिसतंय्! तुम्ही चौदा गद्य पाठ अभ्यासायला उत्सुक आहात. या सर्व गद्य पाठांतील विचारधन आणि शब्दमाधुर्याचा आनंद घेणार आहात. प्रत्येक पाठाची अनुभूती घेऊन ज्ञान मिळवणार आहात. मनात कुठेही ताणतणाव नको. 'नवे ते हवे' या विचाराने गद्य पाठांचे सावकाशपणे, सूक्ष्मपणे वाचन करा. नवीन पाठ्यपुस्तक फार सोपे व आशयप्रधान आहे. तुमच्या प्रवृत्ती संस्कारक्षम करणारे आहे. मराठीचा अभ्यास हा आपल्या आंतरिक जिव्हाळ्याचा भाग आहे. भाषिक कौशल्ये आत्मसात करीत, समग्रपणे अभ्यास करा.

**गद्य पाठाचे नाव- 'सिंदेराणे यांचा दृष्टांत', लेखक - केसोबास**

**प्रास्ताविक-** मुकुंदराजानंतर यादवकाळातील महत्त्वाचे मराठी साहित्य म्हणजे महानुभाव पंथाचे होय. श्री चक्रधरस्वामी हे संस्थापक होत. ते मूळचे गुजरातमधील भडोच या गावचे रहिवासी होते. त्यांचे मराठी भाषेवर व महाराष्ट्रावर अतिशय प्रेम होते. त्यांनी विशिष्ट असा आचारधर्म सांगितला. श्री चक्रधरस्वामींनी वेळोवेळी आपल्या शिष्यवरांना जो उपदेश केला त्यातून महानुभावीय आचारधर्म स्पष्ट झाला. यावर श्रेष्ठ अशी ग्रंथसंपदा निर्माण झाली. केसोबासांनी नागदेवाचार्यांच्या सूचनेवरून मराठी रचना केली. 'दृष्टांतपाठ' या सुप्रसिद्ध ग्रंथात तत्कालीन समाजाचे दर्शन घडते. केसोबास यांनी दार्ष्टांतिक रचले आणि महानुभावीय तत्त्वज्ञानाचे पुन:कथन केले आहे. दृष्टांताची भाषा रसाळ आहे. वाक्यरचना सोपी, सुटसुटीत आहे. प्रत्येक वाक्याला विशिष्ट असा नाद आहे, सुबद्ध लय आहे. वाक्यात गोडवा आहे. प्रसंग हुबेहुब चित्रित करण्याचे सामर्थ्य आहे. तत्कालीन मराठीचा एक रम्य नमुना म्हणून या पाठाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**आशय : सूत्र-** पुरुष आपल्या सदाचाराने कर्म करीत असताना कीर्ती आणि सन्मान संपादन करीत असतो.

**दृष्टांत-** कोणे एके काळी एक राजा होता. एकदा तो आपले राज्य गमावून बसला. त्यामुळे त्याचा सेवक परिवार अन्य कोणाकडे सेवादास्य करू लागला. सिंदेराणे मात्र राजसिंहासनाखेरीज सेवाचाकरीस गेले नाहीत. त्यांनी कोणाचाही जयजयकार केला नाही. कोणी दिलेले काहीही त्यांनी घेतले नाही. कोणापुढे हात पसरले नाहीत. एक विशिष्ट प्रकारचा उद्योग करून त्यांनी आपल्या कुटुंबाचा सांभाळ केला.

कालांतराने पुन्हा राजा आपल्या राजपदी बसला. मग त्याचा सर्व पाइक परिवार पुन्हा राजाच्या जवळ आला. एके दिवशी राजा सिंहासनावर बसला असताना त्याने इतकेतिकडे पाहिले. (चहुकडे दृष्टी फिरवली) मग तो म्हणाला, ''तुम्ही सगळे आला आहात. पण आमचे सिंदेराणे दिसत नाहीत. ते कुठे आहेत?'' मग त्यांनी सांगितले की, ते कोणाचीही सेवाचाकरी करीत नाहीत. कोणाही पुढे ते हात पुढे करीत नाहीत. ते स्वत:चा उद्योग करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मग राजाने पालखीचे भोई पाठवून सिंदेराणेंना आणावयास धाडले. तो स्वतः सर्व सैन्यासह त्यांना सामोरा गेला. त्यांना वाजतगाजत घेऊन आला. राजाने त्यांना अर्धे राज्य देऊन समान योग्यता दिली.

**दार्ष्टांतिक -** त्याप्रमाणे अनुसरलेला पुरुष अन्य कोणाची सेवाचाकरी करीत नाही. कोणाचाही जयजयकार करीत नाही. केवळ उदरनिर्वाहापुरतेच मिळवून कुटुंबाचा सांभाळ करतो. अशा पुरुषास परमेश्वरसान्निध्य प्राप्त होते.

**प्रश्न** - खालील प्रश्नाचे उत्तर सुमारे ३० ते ४० शब्दांत लिहा-

१) प्रस्तुत दृष्टांतकथेतून कोणता बोध मिळतो?

**उत्तर** - 'सिंदेराणे यांचा दृष्टांत' या कथेतून श्री चक्रधरस्वामी यांना सदाचाराचा बोध द्यावयाचा आहे. स्वत:च्या मूल्यांशी प्रामाणिक राहून जीवन जगल्यास परमेश्वरी कृपा मिळते. तत्कालीन जीवनाची माहिती देणारी कथा आजच्या वर्तमानकाळाचे भान ठेवण्यास मार्गदर्शन करते. जीवनमूल्यांशी एकनिष्ठ राहून मार्ग आक्रमीत गेल्यानंतर सन्मान प्राप्त होतो. बिकट काळीही अनुचित मार्ग स्वीकारू नये, हा बोध मिळतो.

**गद्य पाठ २**

**गद्य पाठाचे नाव - 'सत्यवर्तन',लेखक - महात्मा जोतिराव फुले**

**प्रास्ताविक-** 'सार्वजिनक सत्यधर्म पुस्तक' हा महात्मा फुले यांचा ग्रंथ त्यांच्या मानवविषयक संकल्पनेचे समग्र दर्शन घडविणारा उद्‌बोधक ग्रंथ होय. मानवी स्वातंत्र्याचा जणू जाहीरनामाच होय. मानवी प्रतिष्ठा, मानवी समानता आणि धार्मिक सहिष्णुता ही मूल्ये या ग्रंथाची मूलाधार प्रेरणा आहे. नवे मानवतावादी ध्येय व त्याची परिपूर्ती हाच त्यांच्या जीवनाचा आत्मा होय.

सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजात वैचारिक जागृती घडवून आणली. अज्ञान, अंधश्रद्धा, अस्पृश्यता या सामाजिक व्याधीतून बहुजन समाजाची मुक्तता केली. भारताची खरीखुरी एकात्मता साध्य करण्यासाठी स्त्री-पुरुष समानता हा पुरोगामी विचारही त्यांनी समाजात रुजविला.

'सत्यवर्तन' हा पाठ म्हणजे महात्मा फुले यांच्या मनस्वी तत्त्वनिष्ठेचा प्रत्ययकारी अनुभव देणारा दीपस्तंभच आहे. सत्याचरण हीच जीवननिष्ठा होय.

**पाठाचा आशय :** स्वतंत्र, परिच्छेदात्मक रचना हे या गद्य पाठाचे वेगळेपण आहे. सत्यवर्तनाने वागणाऱ्या व्यक्तीची लक्षणे येथे स्पष्टपणे सांगितली आहेत. गणपतराव थोरात हे जोतिराव फुले यांचे सहकारी. 'सत्यवर्तन करणार कोण?' या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सत्यवर्तनाचे नियम समजावून दिले आहेत. त्यांपैकी काही नियम या पाठात आले आहेत. हे विचार स्पष्ट करताना त्यांनी देवासाठी निर्मिक, विश्वकर्ता, निर्माणकर्ता हे शब्द वापरले आहेत. निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणिमात्रांस उत्पन्न केले. स्त्री-पुरुष हे जन्मताच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र केले आहेत, असे कबूल करणारे ते सत्यवर्तनी होत. असे स्पष्ट करीत त्यांनी चोवीस लक्षणांतून मानवी स्वातंत्र्याचा आलेख चितारला आहे.

स्त्री-पुरुष समानतेबद्दल त्यांचे मार्मिक विचार आधुनिक काळातही समाजघटकांना मार्गदर्शक ठरतात. अपंगांची सेवा, रुग्णांची सेवा करणे ही सत्यवर्तनी आचाराची शुद्धता आहे. हा विचार, आधुनिक काळात समाजाची संरचना करण्यास मार्गदर्शक ठरणारा आहे.

वृद्ध माता-पित्यांची आणि समाजातील इतर थोर मंडळींची सत्यवर्तनी काळजी घेतात. हा क्रांतिकारी विचार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांना समाजातील बौद्धिक व मानसिक दुबळेपण दिसत होते. समाजाला कणखर बनविण्यासाठी त्यांनी दिव्यदृष्टी दिली.

तत्कालीन समाज स्त्री-शिक्षणास प्राधान्य देणारा नव्हता, स्त्रीला फारसे स्वातंत्र्य नव्हते, तिच्या उन्नतीसाठी झटणारे कोणी नव्हते, अशा वेळी स्त्री आणि पुरुष यांच्यात समानता असावी असे प्रतिपादन करणे हाच राष्ट्रोन्नतीचा दूरदर्शी विचार महात्मा फुले यांनी व्यक्त केला. या कार्यातूनच ते महात्मा झाले. नीती हाच मुळी त्यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. मानवी स्वातंत्र्याकडे व समतेकडे नेणारा विचार त्यांनी दिला. प्रत्येकाला मतस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य आहे. पण हे स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर आघात करणे उचित नव्हे. हे भान जे ठेवतात तेच सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

**खालील वाक्याचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा-**

★ निर्माणकर्त्याने एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे.

**संदर्भ** - महात्मा जोतिराव फुले यांनी आपल्या 'सत्यवर्तन' या लेखात सत्यवर्तनी व्यक्तीची लक्षणे स्पष्ट करताना वरील प्रतिपादन केले आहे.

**स्पष्टीकरण -** महात्मा फुले यांनी सत्यवर्तनी व्यक्तीविषयी भाष्य करताना निर्माणकर्त्याने समान न्याय दिला आहे. या नैसर्गिक गोष्टीची सत्यता स्पष्ट केली आहे. सर्व स्त्री-पुरुष यांना धार्मिक बाबतीत तसेच राजकीय बाबतीत स्वतंत्रता दिली आहे. समानतेचा लाभ सर्वांनी घ्यावा. कुणीही धर्म, पंथ, जात याबाबतीत भेदभाव करू नये. कुणी कुणाचे अधिकार घेऊ नयेत. स्त्री अथवा पुरुष हा भेदाभेदही मानू नये.

**भाषाविशेष -** १) निर्माणकर्ता हा शब्दप्रयोग नावीन्यपूर्ण आहे.
२) सत्यवर्तनी व्यक्तीचे गुणविशेष प्रभावीपणे मांडले आहेत.
३) स्त्री-पुरुष समानतेचा विचार मानवता पातळीवरून व्यापक स्वरूपात मांडला आहे.

**उद्याचा विषय : विज्ञान I**

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com